
ISSN 2230-7850 Impact Factor : 4.1625 (UIF) Volume - 6 | Issue - 5 | June - 2016
Indian Streams Research Journal

# ‘उच्च शिक्षणात नैतिक मूल्यांचे महत्व’

डॉ. विमल राठोड
राज्यशास्त्र विभागप्रमुख पी. डब्ल्यू. एस. कॉलेज , नागपूर.




**सारांश**
आजचे युग विज्ञानाचे युग आहे. विज्ञानाचे अनेक क्षेत्रात प्रगती केलेली आहे. त्यामुळे भौतिक आणि औद्योगिक विकास झालेला आहे. परंतु चारित्र्य विकास आणि नैतिक विकासाप्रती माणूस उदासीन आहे. तो केवळ भौतिक विकासाच्या मागे लागलेला आहे. पण नैतिकता, चारित्र्य, तत्वज्ञान, न्याय, स्वातंत्र्य, समता, प्रज्ञा,, शिल, करूणा या मुल्यांचा विचार करायला माणसाजवळ वेळ नाही. एकविसाव्या शतकात प्रगतीमुळे मनुष्याच्या समोर अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. इंटरनेट, मोबाइलच्या सुविधा उपलब्ध झाल्यामुळे व्यक्तीचा संबंध इतर देशाशी येत आहे. त्यामुळे इतर देशांच्या संस्कृतीचा परिणाम भारतीय संस्कृतीवर होत आहे. म्हणून विद्यार्थ्यांत चारित्रयांना, नैतिकता, देशप्रेम, भ्रष्टाचारापासून परावृत्त हे गुण वाढविण्याकरीता उच्च शिक्षणात मूल्य शिक्षणाचा समावेश होणे आवश्यक आहे. शिक्षणच केवळ व्यक्तीत चांगले परिवर्तन घडवून आणू शकते.

**KEY WORDS:** विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, चारित्र्य, नैतिकता, मुल्ये, भ्रष्टाचार, विद्यार्थी विकास, महाविद्यालय उच्च शिक्षण, संस्कृती.

## प्रास्ताविक

आजचे युग विज्ञानाचे युग आहे आज विज्ञानाने अनेक क्षेत्रात प्रगती केलेली आहे. त्यामुळे वर्तमान काळात विकासाच्या अनेक संकल्पना समोर येत आहेत. त्यापैकी जास्तीत जास्त संकल्पना भौतिक विकास आणि औद्योगिक विकासांशी संबंधीत आहेत. परंतु चारित्र्य विाकस आणि नैतिक विकासाप्रती माणूस उदासीन आहे. समाजात त्याला फार महत्वाचे स्थान आहे या बाबतीत माणूस फारच संकुचित आहे. माणूस केवळ भौतिक विकासाच्या मागे दिखावाच्या मागे धावत आहे. पण नैतिकता, चारित्र्य, तत्वज्ञान, न्याय, चारित्र्य, प्रज्ञा, शिल, करूणाा या मुल्यांचा विचार करावारा माणसाजवळ वेळ नाही.

एकविसाव्या शतकात वैज्ञानिक प्रगतीमुळे मनुष्याच्या समोर अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. आज प्रत्येक देशाला प्रगतीच्या शिखरापर्यंत पोहचायचे आहे. ‘एकविसावे शतक विज्ञान व तंत्रज्ञानाचे शतक असल्यामुळे विज्ञांनाने अनेक क्षेत्रात चमत्कारिक प्रगती केलेल्या आहेत. कम्प्युटर , मोबाईल, इंटरनेट, प्रसार माध्यमे, इत्यादी मुळे मनुष्याच्या प्रगतीत तिव्र, गतीने वाढ झालेली आहे. विज्ञानामुळे आणि तंत्रज्ञानामुळे अनेक देश जवळ जवळ आलेले आहेत त्यामुळे संस्कृतीत, भाषेत, आचार—विचारात बदल होतांना दिसत आहे. संपूर्ण जग ‘ळसवइंस टपससंहम’ बनले आहे. त्यामुळे एका देशाच्या संस्कृतीच्या परिणाम

दुस—या देशाच्या संस्कृतीवर होत आहे. ' त्यामुळे व्यक्तीचे नैतिक, सामाजिक, आर्थिक जीवनात बदल झालेला आहे.

इंटरनेट मुळे, मोबाईल प्रसार माध्यमांमुळे इतर देशाची भारताचा संबंध आल्यामुळे इतर देशासारखे बदल भारतात होतात दसित आहे. भारतात सुद्धा मल्टीप्लेक्स, लक्झरीकार्स, टुरीझम, पिझाहट्स, कॉफॉडे याचे चलन वाढत आहे. इतर देशाप्रमाणे भारतात इंटरनॅशनल स्कूल, कॉलेज उघडलेला आहे. त्यामुळे इतर देशाचे अनुकरण करणे. म्हणजे पाश्चायीकरण स्विकारणे होय. हे भारताकरीता सर्वात मोठे आव्हान ठरत आहे.

इतर देशाशी संबंध वाढल्यामुळे आजचा तरूण बेशीस्त, समाजाप्रती जबाबदारी नसलेला सामाजिक, आर्थिक, राजकीय संस्था विषयी उदासीन असलेला पाश्चात्य संस्कृतीचा अनुकरण करणारा बनलेला आहे. त्यामुळे जबाबदारीचा अभाव असलेला आणि स्वकेंद्रीत जीवन जगणारा तरूण वर्ग असलेली समाजव्यवस्था असे चित्र आज भारताचे दिसत आहे.

'आज इंटरनेटच्या क्षेत्रात प्रगती झाल्यामुळे आजचा तरूण इतर देशात असलेल्या व्यक्तीशी तासनतास नेटवर संपर्क करीता असल्यामुळे बाजू बाजूच्या लोकांशी संपर्क येत नाही त्यामुळे व्यक्ती व्यक्तीचा संबंध दुरावत आहे' आजचे मनुष्य जीवन दुरदर्शन, इंटरनेट आणि चलचित्रपटामुळे सर्वात जास्त प्रभावित होत आहे. त्यामुळे काही चांगले आणि काही वाईट परिणाम मनुष्य जीवनावर होत आहे. त्यामुळे वाईटच परिणाम जास्त प्रमाणात होतांना दिसत आहे. कारण मनुष्य चांगल्या गोष्टीपेक्षा वाईट गोष्टीकडे जास्त आकर्षित होते. त्यामुळे आजचा तरूण मोह निलास भ्रष्टाचार, व्यसनी बनत चाललेला आहे. अशा तरूणांची संख्या दिवसेंदिवस त्यामुळे देशांची अधोगती झाल्याशिवाय राहणार नाही.

या सर्व समस्यांचा परिणाम होवून नैतिक मूल्यांचा —हास होताना दिसत आहे. त्यामुहे नैतिकतेचे पालन करणा—या लोकांना अनेक समस्या भेडसावत आहे. अनैतिक व्यक्ती मात्र सुखसमाधानाने जीवन जगत आहे. त्यामुळे दिवसेंदिवस भ्रष्टाचार वाढत आहे. व नैतिक मुल्यांच्या विासाचा —हास होतांना दिसत आहे. त्यामुळे आजचा तरूण बेशिस्त होवून व्यक्तीसाठी, स्वार्थी आणि भ्रष्टांचारी बनत चालला आहे.
आज आपण पाहतो की, गरीब अधिक गरीब होतांना दिसत आहे. आणि श्रीमंत अधिक श्रीमंत होतांना दिसत आहे. वाढती लोकसंख्या, वाढती स्पर्धा, संसुचनाची वाढती साधने, भोगवाद, व्यवसीनृत्ती, हे नैतिक मुल्यांच्या विकासात अडथळा निर्माण करीत आहे. या सर्वांची जड म्हणजे आजच्या तरूण वर्षावर नैतिक स्ंस्कार होत नाही आहे त्या दिशेने प्रयत्न व्हायला पाहिजे. त्याकरीता उच्च शिक्षण प्रणालीत सुधारणा होणे आवश्यक आहे. लहानपणापासून नैतिक संस्कार झालेला आणि किशोर अवस्थेत नैतिक संस्कार झालेला विद्यार्थी कोणत्याही परिस्थितीत टिकून राहू शकतो. त्याकरीता शैक्षणिक क्षेत्रातून मुलांवर चांगल्या सामाजिक मुल्यांचे संस्कार झाले पाहिजे.

'शिक्षणाचा उद्‌देश व्यक्तीला कर्तव्यशील, चारित्र्यावान, तत्वज्ञ बनविणे हा असतो. आपल्या कर्तव्याची जाणीव शिक्षणाद्वारे होत असते. महाविद्यालयीन शिक्षणाद्वारे होणारे संस्कार जास्त महत्वाचे असतात. महाविद्यालयीन जीवनाचे चार पाच वर्ष विद्यार्थी जीवनातील महत्वाची अवस्था असते.' महाविद्यालयीन जीनातील किशोर अवस्थेतील १७ ते २१ हे वय अत्यंत संवेदनशील असते. या वयातील विद्यार्थी अत्यंत जिद्‌दी आणि कोणतेही कार्य चुरशीने करण्याची तयारी दर्शविणारा असतो. या वयातच त्याला ख—या मार्गदर्शनाची आवश्यकता असते. त्या मध्ये त्यांना दिशा दाखविण्याचे कार्य प्राध्यापक करीत असतो. महाविद्यालयीन शिक्षण केवळ रोजगार उपलब्ध करून देत नाही. तर त्याचबरोबर विद्यार्थ्याला नैतिक मूल्य, आचार, विचार, कर्तव्यदक्षता, चारित्र्यवान, तसेच जीवनात येणा—या चढाव उताराला कशा पद्धतीने सोडविले पाहिजे हे शिकविण्याचे कार्य करीत असते. म्हणून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना नियमित पाठयक्रमासोबतच नैतिक मुलयाचे शिक्षण कशा पद्धतीने देण्यात यावे यावर विचार होणे, अत्यंत गरजेचे आहे. आज आपण पाहतो की, विद्यार्थी जास्तीत जास्त प्रमाणात शारिरिक दृष्टयारोगी नाही. पण भावनात्मक दृष्टया रोगी आहे. त्यामुळे आजचा विद्यार्थी भावनात्मक दृष्टया रोगी होणार नाही यावर निदान होणे गरजेचे आहे. केवळ परीक्षेत चांगले गुण प्राप्त करणारा विद्यार्थी स्पर्धा परीक्षेत टिकून राहू शकत नाही. तसेच तो विद्यार्थी सामाजिक व्यवहारात मागे पद्धती म्हणून विद्यार्थ्यांमध्ये बृद्धिमत्ता सोबतच नेतृत्वगुण भाषेवर प्रभुत्व भाषणकला, विषय मांडण्याची कला, समयसुचकता, तार्किक ज्ञान, विद्यार्थ्यामध्ये होणे आवश्यक आहे. त्याकरीता प्राध्यापकाद्वारे आणि महाविद्यालयांद्वारे विविध कार्यक्रमाचे आयोजन होणे आवश्यक आहे. व्यक्ती केन्द्रीत विकासापेक्षा विद्यार्थ्यांचा नैतिक विकास व्हायला पाहिजे. विद्यार्थ्यामध्ये

सामाजिक मुल्याप्रती आवड निर्माण झाली पाहिजे. तसेच विद्यार्थ्यांना त्यांची पालन करण्याची सवय झाली पाहिजे. म्हणून विद्यार्थ्यांच्या अभ्छयासक्रमासोबतच त्यांना, न्याय, स्वातंत्र्य, समता, कएता, बंधुत्व, प्रज्ञा, शिल, करूणा, नैतिकता, देशप्रेम, आत्मियता, आदर्श नागरिकांचे गुण इत्यादी मुल्यांचे शिक्षण देणे गरजेचे आहे. केवळ गरजेचे नाही तर काळाची गरज देखील आहे.

## निष्कर्ष

१. उच्च शिक्षण विद्यार्थ्यांना दिशा दाखविण्याचे कार्य करते.
२. उच्च शिक्षणातील नैतिक मुल्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होतो.
३. नैतिक मुल्ये विद्यार्थ्यांना जबाबदारीची जाणीव करून देतात.
४. सामाजिक विकासाकरीता नैतिक मुल्यांची भूमिका महत्वाची असते.
५. वाढते भ्रष्टाचार, बरोजगारी, विकासाची अधोगती, बेशिस्त तरूण वर्गाचे वाढते. प्रामण याला जबाबदार मुल्यविरहीत शिक्षण प्रणाली आहे.

## संदर्भ ग्रंथ :

१. शांता मालेगावकर— आजचे शिक्षण एक वास्तव, संपादन, विद्यार्थी सहायक समिती, पुणे, द्वितीय आवृत्ती, डिसेंबर — २००८, पृष्ठ क्र. ८४.
२. कृष्ण कुमार— शासन समाज आणि शिक्षण, लोकवाड मय ग्रंथ, मुंबई, प्रथम आवृत्ती, आष्टी २००७, पृष्ठ क्र. १२१
३. अरविंद शृंगारपुरे — पाश्चात्य राजकीय विचारवंत, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर तृतीय आवृत्ती, जानेवारी २००४, पृष्ठ क्र.